# महाराष्ट्र शासन
# कला संचालनालय

सर ज.जी.कला महाविदयालय आवार,डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई ४०० ००१. दुरध्वनी क्र.-२२६२०२३१/३२

परीक्षा /अत्यंत महत्वाचे

शासकीय रेखाकला परीक्षा - २०१४
आयोजित करण्याबाबत....

परिपत्रक क्र. डिओअे/शारेप-२०१४/चार/1015 , दिनांक :- 20 JUN 2014

**परिपत्रक :-** महाराष्ट्र शासनाच्या वतीने या संचालनालयामार्फत प्रतिवर्षी रेखाकला परीक्षांचे आयोजन करण्यात येते. या वर्षासाठीच्या परीक्षा **प्रचलित अभ्यासक्रमानुसार** माहे सप्टेंबर २०१४ च्या अखेरच्या सप्ताहात आयोजित करण्यात आलेल्या आहेत. परीक्षानिहाय वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे. **आपल्या केंद्राचा नवीन सहा अंकी कोड क्रमांक लाल शाईने ठळकपणे आपल्या निकालपत्रकावर व पत्रव्यव्हार करताना नमूद करण्यात यावा.**

**एलिमेंटरी ग्रेड परीक्षा : बुधवार दि. २४ सप्टेंबर २०१४ व गुरवार दि. २५ सप्टेंबर २०१४**

**इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा : शुक्रवार दि. २६ सप्टेंबर २०१४ ते रविवार दि.२८ सप्टेंबर २०१४**

२. परीक्षा फॉर्मस विद्यार्थ्यांकडून/ सहभागी शाळांकडून भरुन घेण्यासाठी तसेच संबंधित निकालपत्रके व परीक्षा फी या कार्यालयात पाठविण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित केल्या असून यापुढे या तारखांन मध्ये बदल होणार नाही. याची नोंद घ्यावी.

अ) विद्यार्थ्यांनी/सहभागी शाळांनी **परीक्षा केंद्र असलेल्या शाळांकडे /केंद्राकडे** अर्ज करण्याची अंतिम तारीख :

**मंगळवार दि. २२ जुलै, २०१४**

ब) परीक्षा केंद्र असलेल्या शाळांकडून **परीक्षा नियंत्रक , कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई** येथे **निकालपत्रके दोन प्रतित सीडीसह, व परीक्षा फी** सादर करण्याची अंतिम तारीख :

**गुरवार दि. ३१ जुलै, २०१४**

एलिमेंटरी व इंटरमिजिएट शासकीय रेखाकला परीक्षा शुल्क खालीलप्रमाणे आहे.

| | परीक्षा | महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी | महाराष्ट्रा बाहेरील इतर राज्यातील विद्यार्थ्यांसाठी. |
|---|---|---|---|
| १) | एलिमेंटरी | रुपये ५०/- | रुपये १००/- |
| २) | इंटरमिजिएट | रुपये १००/- | रुपये २००/- |

क) केंद्र चालकांनी परीक्षा प्रवेश संबंधीची कार्यवाही त्वरीत सुरु करुन तसेच प्रवेशाची अंतिम तारीख कळविणारे परिपत्रक आवश्यक त्या फॉर्मसह सहभागी शाळांना पाठविण्याची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे प्रवेशाच्या अंतिम तारखेस नोटीस बोर्डवरही ठळक अक्षरात प्रसिध्दी देण्यांत यावी.

**ओळखपत्राबाबत महत्वाची सूचना :**

३. शासकीय रेखाकला परीक्षांकरीता प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांची सोबत जोडलेल्या ओळखपत्राच्या विहित नमुन्यात फोटोसहित त्यांच्या शाळेच्या प्राचार्य / मुख्याध्यापकांच्या सही शिक्का असलेले ओळखपत्र दोन प्रतीत तयार करावे . त्याची एक प्रत केंद्रप्रमुखांनी स्वत:कडे ठेवावी व दुसरी प्रत केंद्र प्रमुखांनी त्यावर सही करुन विद्यार्थ्यांस परत करावी, की जी संबंधित विद्यार्थ्यांने प्रत्यक्ष परीक्षेच्या कालावधीत स्वत:जवळ ठेवावयाची आहे.

४. **विद्यार्थी प्रवेशाबाबत सूचना :-**

**या संचालनालयाच्या असे निदर्शनास येते की, शासकीय रेखाकला परीक्षेची, निकालपत्रके या कार्यालयात विहित मुदतीत सादर केल्यानंतर किंवा परीक्षेच्या ऐनवेळी जादा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबतची विनंती वा सरळ सरळ पूर्व परवानगीशिवाय परीक्षेस थेट प्रवेश देतात. यामुळे परीक्षांबाबतच्या सर्व कामात अडथळा निर्माण होत असून विनाकारण पत्र व्यवहार होत असतो. यास्तव, याबाबत केंद्र प्रमुखांना सक्त ताकीद देण्यांत येते की, एकदा निकालपत्रके व फी या कार्यालयात सादर केल्यानंतर जादा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांबाबत कोणत्याही परिस्थितीत विनंती करण्यांत येऊ नये, ती मान्य केली जाणार नाही. याबाबत पत्रव्यवहारही केला जाणार नाही. याची नोंद घेण्यांत यावी. त्याचप्रमाणे निकालपत्रकात नमूद केलेल्या नावांव्यतिरिक्त जादा थेट प्रवेश देवून विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे संच गठ्ठयात अनधिकृतपणे समाविष्ट केल्यास त्या उत्तरपत्रिकांवे मुल्यमापनही केले जाणार नाही. याबाबत होणा-या शिस्तभंगाच्या कारवाईस केंद्रप्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल व त्यांचे निकाल जाहीर केले जाणार नाहीत .**

५. निकालपत्रक संगणकीकृतरीत्या तयार करताना घ्यावयाची दक्षता :-

**एलिमेंटरी व इंटरमिजिएट विद्यार्थ्यांची नावांची यादी ( Times New Roman १२ pt या इंग्रजी कॅपिटल अक्षरामध्ये )** व इतर सर्व माहिती, निकालपत्रकाच्या रचनेप्रमाणे **संगणकाव्दारे मायक्रोसॉफट एक्सेल (MICROSOFT EXCEL) स्वतंत्र फाईल तयार करुन करण्यात यावी** व ती केंद्र क्रमाक, व परीक्षेचे नाव, व वर्ष या नावाने सेव्ह करण्यात यावी. तसेच तयार करण्यात आलेली उक्त माहिती संगणकाव्दारे , या कार्यालयामार्फत पुरविण्यात आलेल्या निकालपत्रकावर छपाई करण्यात यावी. अथवा लिगल साईज पेपरवर छपाई करण्यात यावी.त्यापेक्षा मोठया आकाराचे पेपर वापरण्यात येवू नये याची दक्षता घेण्यात यावी. तसेच निकालपत्रकाच्या प्रत्येक पानावर २० पेक्षा जादा किंवा कमी नांवे असू नये.निकालपत्रकातील नांवामध्ये व्यवस्थत अंतर ठेवावे.

उक्त परीक्षेच्या परीक्षार्थींच्या नावाची यादी **शाळेच्या नोंदीनुसार** काळजीपूर्वक तयार करुन **नावांची अदलाबदल होणार नाही तसेच नांवे गाळली जाणार** याची योग्य ती दक्षता घेण्यात यावी. आणि जर वरीलप्रमाणे नावांची अदलाबदल तसेच गाळली गेल्यास ऐनवेळी त्यास इच्छित परीक्षेस प्रवेश देण्याबाबतची विनंती मान्य करण्यांत येणार नाही. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे नांव अंतिमरित्या निकालपत्रकात संगणकीय टंकलिखित करतांना प्रथम आडनांव, विद्यार्थ्यांचे नांव व वडिलांचे नांव या अनुक्रमाने करावे व विद्यार्थ्यांच्या नावाच्या सुरवातीस कुमार, कुमारी, मास्टर इत्यादी.उल्लेख करु नये.

६. निकालपत्रकात समाविष्ट विद्यार्थ्यांची नावे व माहिती सी.डी. स्वरुपात मागविण्याबाबत :-

अ. उपरोक्त अनुक्रमांक ५ नुसार एलिमेंटरी व इंटरमिजिएट तयार करण्यात आलेली माहिती (फाईल), यांची **एकच सी.डी.** तयार करण्यात यावी. सदर सी.डी. व्यवस्थित राईट झाली आहे किंवा नाही याची खातर जमा करुन, रिझल्टशीट सोबत सी.डी. फुटणार नाही अशा सुरक्षेसह **निकालपत्रकासोबतच या कार्यालयात पाठविण्यात यावी. अथवा controllerofexamination.doa@gmail.com या इमेलआयडींवर पाठविण्यात यावी. सदर फाईल मागावून पाठविण्यात येणारी सी.डी. स्विकारली अथवा ग्राहय धरली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.**

ब. सी.डी. वर केंद्र क्रमांक, केंद्राचे नाव , परीक्षा वर्ष यांचा उल्लेख करण्यात यावा.

क. निकालपत्रकातील नांवे व सी.डी. वरील नांवे यांच्यामध्ये फरक असता कामा नये याची नोंद घ्यावी. तसेच याबाबतचे सोबतचे प्रमाणपत्र मुख्याध्यापक/केंद्र प्रमुख यांच्या स्वाक्षरीने निकालपत्रकाच्या आतील बाजूर लावण्यात यावे.

**७. एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेच्या उत्तरपत्रिकेबाबत घ्यावयाची दक्षता :-**

परीक्षा कालावधीत विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका बाबत घ्यावयाच्या विशेष दक्षतेबाबत केंद्र प्रमुखांना सुचना देण्यांत येत असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.

१) परीक्षार्थी विद्यार्थ्याने उत्तरपत्रिकेवर आपले नांव व इयत्तेचा संपूर्ण उल्लेख करावा.

२) शाळां व्यतिरिक्त जे विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होतील अशा विदयार्थ्यांच्या नांवापुढे रिमार्क कॉलम मध्ये "PRIVATE" असे लिहावे.

३) परीक्षेस अंशत: गैरहजर किंवा पूर्णपणे अनुपस्थित असणा-या विद्यार्थ्यांच्या नोंदी व्यवस्थितपणे दोन प्रतीत भरुन परीक्षा नियंत्रकांकडे प्रत्यक्ष परीक्षा कालावधीत व उत्तरपत्रिकांबरोबर गठ्ठयात दिलेल्या सुचनेनुसार पाठवाव्यात.

४) परीक्षेस अनुपस्थित असणा-या विद्यार्थ्यांच्या जागी ऐनवेळी दुस-या विद्यार्थ्यास प्रवेश देऊ नये. प्रवेश दिल्यास सदर प्रवेश अनधिकृत मानण्यांत येवून सदरचा निकाल रद्द करण्यात येईल.

५) परीक्षा निकालपत्रकात ज्या विद्यार्थ्यांच्या नावाची नोंद असेल त्यांच्याच उत्तरपत्रिका तपासल्या जातील.

६) प्रत्येक विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचा संच बांधतांना १) स्थिरचित्र, २) निसर्ग चित्र,३) स्मरणचित्र, ४) संकल्प चित्र, ५) मुक्तहस्त चित्र व ६) भूमिती — अक्षरलेखन या क्रमाने बांधाव्यात. संच बांधताना उत्तरपत्रिकेवर उठवलेला शिक्का उजव्या भागात समोरच्या बाजूने येईल असे पहावे.

**८) <u>उत्तरपत्रिकेवर छापलेला शिक्का पुढीलप्रमाणे असावा.</u>**

ELEMENTARY/INTERMEDIATE

Centre No.:__________ Name of the Centre:______________________

Candidate's Seat No. [ ]

Candidate Full Name: (SURNAME ) (MIDDLE NAME) (FATHER NAME)

Participating School Name :__________________________________

Subject :______________________________

Studetnt Signature :_______________

Supervisor's Signature : _______________________ DATE_______

एलिमेंटरी / इंटरमिजिएट
केंद्र क्रमांक: ____________ केंद्राचे नांव ______________________________

विद्यार्थ्याचा क्रमांक: [ ]

विद्यार्थ्यांचे संपूर्ण नांव : ______________________________

सहभागी शाळेचे नांव : ______________________________

विषय : ______________________________

विद्यार्थ्यांची स्वाक्षरी : ______________________

पर्यवेक्षकाची सही : ______________________ दिनांक ________

---

९. प्रत्येक विषयाच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची उत्तरपत्रिकेवर स्वाक्षरी घेण्यात यावी. परीक्षेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या पर्यवेक्षकांनी विद्यार्थ्याने उत्तरपत्रिकेवर विहीत ठिकाणी स्वाक्षरी केली आहे की नाही हे तपासून पर्यवेक्षकाने स्वाक्षरी करण्यात यावी परीक्षेच्या त्या त्या दिवसाच्या हजेरी नोंद वहीत विद्यार्थ्यांची आसन क्रमांक निहाय स्वाक्षरी घेण्यात यावी.

परीक्षा केंद्र कोड :- विषय :-

परीक्षेचे नांव :- दिनांक :- वेळ :-

**<u>हजेरी नोंद वही</u>**

| अनुक्रमांक | आसन क्रमांक | विदयार्थ्याचे नांव | विदयार्थ्याची स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

वरीलप्रमाणे नमूद केलेल्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे अनुपालन करावे. तसेच नव्याने करावयाच्या बदलबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

निर्धारीत केलेल्या शुल्काशिवाय जादा शुल्क आकारणी करु नये. आपल्या परिसरातील माध्य. शाळा व बहिस्थ विद्यार्थ्यांना परीक्षेस सामावून घेण्याची कार्यवाही करावी. परिसरातील शाळांतील विद्यार्थ्यांना परीक्षेस अनुमती

नाकारल्यास संबंधित केंद्रचालक व केंद्र प्रमूख विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. आपल्या परीक्षा केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही. व परीक्षेच्या गोपनियतेची गांभीर्याने दखल घेण्यात यावी. याबाबत केंद्र प्रमुखांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी.

**परीक्षा नियंत्रकांशी पत्रव्यवहार करतांना संबंधीत पत्रावर तसेच निकालपत्रके, अनुषंगिक खर्चाची व मेहनताना देयके इत्यादीवर आपल्या केंद्राचा नवीन सहा अंकी कोड क्रमांक लाल शाईने ठळकपणे नमूद करण्यात यावा, असे केंद्र क्रमांक लिहिल्यामुळे आपला पत्रव्यवहार त्वरीत हाताळणे सुलभ होते.**

**( भा. ना. तिखे )**
**प्र. परीक्षा नियंत्रक,**
**कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य,**
**मुंबई.**

सोबत :- वरीलप्रमाणे.

कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
शासकीय रेखाकला परीक्षा - २०१४

---

## केंद्र आकस्मिक खर्च पावती

केंद्र कोड क्रमांक :-

परीक्षा केंद्राचे नांव :- ______________________

(संपूर्ण पत्ता व पिनकोडसह) ______________________

प्राचर्य / मुख्याध्यपकाचे नांव :- ______________________ दूरध्वनी क्रमांक ____________
(एसटीडी कोडसह)
भ्रमणध्वनी क्रमांक ____________

कला शिक्षकाचे नांव :- ______________________ दूरध्वनी क्रमांक ____________
(एसटीडी कोडसह)
भ्रमणध्वनी क्रमांक ____________

| अ. क्र. | परीक्षा प्रकार | परीक्षेसाठी नोंद झालेली विद्यार्थी संख्या | प्रति विदयार्थी फी | एकूण फी | प्रति विद्यार्थी केंद्र खर्च रक्कम | एकूण आकस्मिक खर्च | आकस्मिक खर्च वजा जात डी.डी. व्दारे जमा करण्यात आलेली फी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एलिमेंटरी | | | | रु.२०/- | | |
| २ | इंटरमिजिएट | | | | रु. २०/- | | |
| | एकूण | | -------- | | ------------------ | | |

विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कातून कमी करण्यात आलेली रोख रक्कम रु.
रुपये.______________________ फक्त
केंद्र आकस्मिक खर्चापोटी प्राप्त झाली.

कला शिक्षकांची स्वाक्षरी

रु.5000/- पुढे रिव्हेन्यु मुद्रांक लावणे.

ठिकाण :-

मुख्याध्यपक/केंद्र प्रमूख स्वाक्षरी

तारीख :-

( शाळेच्या रबरी शिक्का )

---

कार्यालयिन वापरासाठी :- रक्कम रु. पावती क्रमांक दिनांक.